दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक २५८ वा मंगळवार दि.१९ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# 'माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, हे शब्द कुठे गेले?' : मुख्यमंत्री शिंदेंचा उद्धव ठाकरेंना सवाल

शिवाजी पार्कवरील शिवतीर्थावरील आघाडीच्या सभेला संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी जाणीवपूर्वक 'माझ्या तमाम हिंदू बांधवांनो' हा शब्द टाळला, असा दावा करत उद्धव ठाकरे यांच्या मनातील हिंदुत्त्व कुठे गेले?, असा सवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (दि. १८ मार्च) पत्रकार परिषदेत केला. आम्ही टीका करण्यापेक्षा विकास कामांना महत्त्व दिले. महायुतीची सर्व कामे जनतेसमोर आहेत, त्यामुळे याचा परिणाम येणाऱ्या लोकसभा निवडणूकीत दिसेल, असा विश्वासही मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. या वेळी उद्योगमंत्री उदय सामंत, शंभूराज देसाई उपस्थित होते. माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, असे संबोधून बाळासाहेब ठाकरे शिवाजी पार्कवरील शिवसेनेची सभेला प्रारंभ करत असत. मात्र काल शिवाजी पार्कवर इंडिया आघाडीच्या सभेवेळी उद्धव ठाकरे



यांनी जाणीवपूर्वक 'माझ्या तमाम हिंदू बांधवांनो' हा शब्द टाळला. त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांचा वैचारिक वारसा सोडल्याचे स्पष्ट झाले आहे. आम्ही बाळासाहेब ठाकरे यांच्या वैचारिक बांधिलकीशी ठाम आहोत. आम्ही याबाबत कोणतीही तडजोड केलेली नाही, असेही शिंदे या वेळी म्हणाले. कालची 'इंडिया' आघाडीची सभा म्हणजे 'फॅमिली गॅदरिंग' रविवार, १७ मार्चला शिवाजी पार्कवरील शिवतीर्थावरील आघाडीच्या सभा झाली. ही सभा म्हणजे इंडिया आघाडीचे फॅमिली गॅदरिंग होते. हद्दपार लोकांनी घेतलेली सभा असल्याचे भासत होते, अशी बोचरी टीकाही मुख्यमंत्री शिंदे यांनी केली. महाराष्ट्रविरोधी व्यक्तींबरोबर बसणे दुर्दैवी जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दूल्ला हे जम्मू-काश्मीरमद्ये महाराष्ट्र सदन उभारण्यास विरोध करत आहेत. त्यांच्यासोबत उद्धव ठाकरे मांडीला मांडी लाऊन बसतात, हे दुर्दैव आहे. भाजप हरवणं सोपं नाही. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत 'एनडीए'ला देशात मोठे यश मिळेल, असा विश्वासही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. महायुतीने २ वर्षात राज्यात भरीव काम केले गेल्या दोन वर्षात महायुती सरकारने राज्यात अनेक भरीव कामे केली. अनेक क्षेत्रात महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. अनेक रखडलेले विकास प्रकल्प आमच्या सरकारच्या कार्यकाळात राबविले गेले. आमच्या आदीच्या सरकारने ज्या कामांना ब्रेक लावला होता, त्याला आमच्या सरकारने वेग दिला. आगामी लोकसभा निवडणुकात आम्हाला याचा नक्कीच फायदा होईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.महायुतीची यादी लवकरच महायुतीच्या जागावाटपाबाबत कोणतेही मतभेद नाहीत, तिन्ही पक्षात समन्वय आहे. समन्वयाने जागावाटपासंदर्भात मार्ग काढला जाईल. लवकरच महायुतीची उर्वरित यादी जाहीर केली जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# देवेंद्र फडणवीसांना घरफोडीचे लायसन्स द्या: उद्धव ठाकरेंचा पलटवार


हिंगोली: : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घरफोडीचे लायसन्स देऊन टाका. ते आता घरफोडे नेते आहेत. त्यांच्या पक्षाचे कमळ निवडणूक चिन्ह काढून त्या जागी हातोडा देऊन टाका, अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांच्यावर पलटवार केला. मी पुन्हा आलो. मात्र, दोन पक्ष फोडून आलो, असे म्हणत फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली होती. या टीकेला ठाकरे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. सोमवारी (दि.१८) वसमत येथे कुटुंब संवाद कार्यक्रमानिमित्त सभा पार पडली. या सभेस विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना नेते संजय राऊत, खासदार संजय जाधव, माजी खासदार सुभाष वानखेडे, माजी आमदार नागेश पाटील आष्टीकर, संपर्कप्रमुख बबन



थोरात, मनोज आखरे, संदेश देशमुख, माजी आमदार डॉ. संतोष टारफे, जिल्हा संघटक बाळासाहेब मगर आदींची उपस्थिती होती.या दौर्यादरम्यान उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. शेतकर्यांच्या प्रश्नावर बोलण्याऐवजी समाजात भांडणे लावण्याचे काम सत्ताधार्यांकडून सुरु आहे. यंत्रणा वापरून खंडण्या गोळा करणार्या भाजप व गद्दारांनी सरकारी यंत्रणा बाजूला ठेऊन निवडणुका घेऊन दाखवा, असे आव्हान ठाकरे यांनी यावेळी दिले.आता अच्छे दिन नाही, तर सच्चे दिन येणार असल्याचे सांगत देशाला भाजपची कीड लागली आहे. सगळ्यांची घरे तुम्ही फोडत आहात, पक्ष तुम्ही फोडत आहात, तुमच्या पक्षांमध्ये घरफोडे तयार झाले आहेत. त्यामुळे तुमच्या पक्षात नेतेच तयार झालेले नाहीत. त्यामुळे तुमच्याकडे नेत्यांचा आदर्श सोडा, उलट आदर्शवादी नेते तुम्ही घेत असल्याचा टोला ठाकरे यांनी लगावला. या माध्यमातून त्यांनी अशोक चव्हाण यांच्यावरही निशाणा साधला. यावेळी मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# मी सोनिया गांधींना भेटलो नाही

नांदेड : तुरुंगाच्या भीतीने सोनिया गांधींसमोर रडल्याचा आरोप राहुल गांधी यांनी अशोक चव्हाण यांच्यावर नाव न घेता केला होता. मात्र, गांधींच्या या आरोपावर अशोक चव्हाणांनी प्रत्युत्तर दिले असून सर्व आरोप फेटाळले आहेत.काँग्रेस नेते



राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेचा समारोप दादरच्या शिवाजी पार्क मैदानात इंडिया आघाडीच्या सभेने झाला. लोकसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर देशातील इंडिया आघाडीने या सभेतील प्रचाराचा नारळ फोडला. याच सभेत भाष्य करताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नुकताच काँग्रेसला सोडचिट्ठी देत भाजपमधून राज्यसभेत गेलेल्या खासदार अशोक चव्हाण यांच्यावर निशाणा साधाला होता. यावर भाजप राज्यसभा खासदार अशोक चव्हाण यांनी आज (१८ मार्च) माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी राहुल गांधी यांच्या आरोपांवर चव्हाणांनी प्रत्युत्तर दिले. 'राहुल गांधींचं वक्तव्य हास्यास्पद असून मी सोनिया गांधींना भेटलो नाही' असे प्रत्युत्तर अशोक चव्हाण यांनी दिले.राहुल गांधी यांनी काल काही विधाने करताना कोणाचे नाव घेतलेले नाही. मात्र, ते विधान माझ्यासंदर्भात असेल तर ते हास्यास्पद आणि अतार्किक आहे. कारण राजीनामा देण्यापूर्वी मी सोनिया गांधींना भेटलेलो नाही. त्यामुळे त्यांना भेटून मी काही भावना व्यक्त केल्याचे विधान चुकीचे आहे, दिशाभूल करणारे आहे, तथ्यहिन आहे.दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे मी पक्ष सोडण्यापूर्वी शेवटपर्यंत काँग्रेसच्या मुख्यालयात काम करत होतो. विधानसभा अध्यक्षांकडे माझ्या आमदारकीचा राजीनामा सुपूर्द केल्यानंतरच ही माहिती समोर आली. त्यानंतर मी पक्षाचाही राजीनामा दिला. त्यामुळे मी पक्ष सोडेपर्यंत त्याविषयीची माहिती कोणालाही नव्हती, हे वास्तव आहे.

# नारायण मूर्तींनी नातवाला गिफ्ट दिले २४० कोटींचे शेअर्स

नवी दिल्ली : प्रसिद्ध आयटी कंपनी इन्फोसिसचे सहसंस्थापक नारायण मूर्ती यांनी आपल्या चार महिन्यांच्या नातवाला १५ लाख शेअर गिफ्ट दिले आहेत. त्याची किंमत २४० कोटी रुपये आहे. हे शेअर कंपनीत ०.०४% आहे. हे शेअर गिफ्ट केल्यानंतर



इन्फोसिसमध्ये नारायण मूर्ती यांची भागिदारी ०.४०% वरुन ०.३६% राहिली आहे.नारायण मूर्ती यांना १० नोव्हेंबर रोजी नातू झाला. नारायण मूर्ती यांचा मुलगा रोहन आणि अपर्णा आई-बाबा झाले. नारायण मूर्ती यांनी नातवाचे नाव संस्कृत शब्द अतूटपासून प्रेरित होऊन ठेवले. त्यांनी नातवाचे नाव एकाग्र ठेवले.एकाग्र यांच्यापूर्वी नारायण मूर्ती आजोबा बनले. त्यांची मुलगी अक्षता आणि ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांना दोन मुली आहेत. त्यांची नावे कृष्णा सुनक आणि अनुष्का सुनक आहेत. ऋषी सूनक काही महिन्यांपूर्वी सहकुटूंब भारत दौ-यावर आले होते. तसेच नारायण मूर्ती यांची पत्नी सुधा मूर्ती यांची आंतरराष्ट्रीय महिला दिनी खासदार म्हणून नियुक्त केल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती.




## महिला दिन विशेष या कार्यक्रमात आशा कार्यकर्त्या, सीआरपी, सफाई महिला कामगार, आरोग्य सेविका आदी विविध महिला कर्मचाऱ्यांचा सुधाकर शृंगारे यांच्या हस्ते सन्मान




लातूर :- भक्ती शक्ती मंगल कार्यालय लातूर येथे झालेल्या या कार्यक्रमात लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदासजी काळे, महिला मोर्चा जिल्हाअध्यक्ष रागिणीताई यादव, युवा मोर्चा अध्यक्ष गणेशजी गोमचाळे, जिल्हा उपाध्यक्ष तुकारामजी गोरे, शिवसिंह शिसोदिया, लालासाहेब देशमुख, रत्नमालाताई घोडके, निर्मलाताई कांबळे, पृथ्वीराज बायस, प्रगतीताई डोळसे आदी पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्ते तसेच आशा कार्यकर्ता, सीआरपी, सफाई महिला कामगार, आरोग्य सेविका आदींसह नागरिक उपस्थित होते.

# मुंबई महापालिकेचे आयुक्त इक्बालसिंह चहल यांची तडकाफडकी बदली

मुंबई : प्रतिनिधी मुंबई महापालिकेचे आयुक्त इक्बालसिंह चहल यांची बदली करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडुन मिळाली आहे. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार ही बदली करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर निवडणूक आयोगानं देशभरातील महत्वाच्या अधिका-यांच्या बदल्या केल्या आहेत. सहा राज्यांतील गृहसचिवांच्या बदल्या भारतीय निवडणूक आयोगाने देशभरातील अनेक अधिका-यांच्या तडकाफडकी बदल्या करण्याचे आदेश जारी केले आहेत. गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या सहा राज्यांतील गृहसचिवांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यासह मिझोराम आणि हिमाचल प्रदेशमधील सामान्य प्रशासकीय विभागाच्या सचिवांच्याही बदल्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालच्या पोलिस महासंचालकांना (डीजीपी) काढून टाकण्याची देखील कारवाई केली आहे.कोण आहेत इक्बालसिंह चहल? इक्बालिंसह चहल हे १९८९ च्या बॅचचे ते आयएएस अधिकारी आहेत. मुंबई महापालिका आयुक्त पदी नियुक्ती होण्याआधी ते जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव म्हणून कार्यरत होते. चहल यांच्याकडे भारतीय प्रशासकीय सेवेचा ३० वर्षांपेक्षा अधिक प्रदीर्घ अनुभव आहे. नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, औरंगाबाद विभागाचे अतिरिक्त आयुक्त, औरंगाबादचे जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हाधिकारी, पर्यावरण विभागाचे सहसचिव, धारावी पुनर्वसन प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी विभागाचे सचिव अशी अनेक पदे इक्बाल चहल यांनी सक्षमतेने भुषवली आहेत.

## संपादकीय....

# ऐन निवडणुकीत ध्रुवीकरणाची तजवीज !

– अजय बुवा मोदी सरकारचे घोषवाक्य आहे ‘सब का साथ सबका विकास आणि सबका विश्वास’; पण ऐन निवडणुकीच्या तोंडावर ज्या पद्धतीने नागरिकत्व सुधारणा कायद्याची आकस्मिक अंमलबजावणी सुरू झाली आहे, त्यातून अल्पसंख्याकांमध्ये पुन्हा वाढलेली अविश्वासाची भावना यातून ‘सबका विश्वास’ हा घोषवाक्यातला तिसरा मुद्दा गौण ठरू पाहत आहे आणि निवडणुकीत विकास, लाभार्थी, आर्थिक प्रगती यासारख्या मुद्द्यांऐवजी धार्मिक ध्रुवीकरणाचा मुद्दाच चर्चेत राहावा, याची तजवीज करण्यात आल्याचे दिसत आहे. संसदेत २०१९ मध्ये संमत केलेला आणि प्रचंड विरोधामुळे मागील ४ वर्षांपासून या ना त्या कारणामुळे बासनात गुंडाळलेला वादग्रस्त नागरिकत्व सुधारणा कायदा मागील आठवड्यात लागू झाला. सत्ताधारी भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यात ठळक उल्लेख असलेल्या नागरिकत्व सुधारणा कायद्याची (सीएए) लोकसभा निवडणुकीच्या आधी अंमलबजावणी करणार, असे सरकारतर्फे सांगण्यात आले होते, हे खरे! मोदी सरकारमधील फारसे परिचित नसलेले राज्यमंत्री शंतनू ठाकूर यांनी फेब–ुवारीमध्ये तशी घोषणा केल्यानंतर हा विषय चर्चेत आला. पाठोपाठ खुद्द गृहमंत्री अमित शहा यांनी त्याचा पुनरुच्चार केला होता. महत्त्वाच्या योजना, कायद्यांची गाजावाजा करत अंमलबजावणी करण्याची कार्यपद्धत असलेल्या या सरकारच्या महत्त्वाकांक्षी कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्याची थेट अधिसूचनाच समोर येऊन आदळली. ही अधिसूचना येण्याचे आणि हा कायदा लागू होण्याचे टायमिंग तसे बुचकळ्यात टाकणारे आहे. ज्या दिवशी निवडणूक रोख्यांवरून देणगीदारांची नावे जाहीर करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाकडून स्टेट बँकेला दिला जातो आणि हा आदेश एकप्रकारे सरकारला दणका असल्याचे दिसत असताना अगदी त्याच दिवशी कोणतीही पूर्वसूचना अथवा घोषणा न करता नागरिकत्व सुधारणा कायद्याची अधिसूचना निघते, हा विलक्षण योगायोग म्हणावा की गैरसोयीच्या विषयांवर चर्चा टाळण्यासाठी माध्यमांचे लक्ष नव्या मुद्द्यांकडे वळविण्याची सत्ताधार्यांची ही राजकीय चतुराई म्हणावी, याचा अर्थ लावायला सारेजण मोकळे आहेत.केवळ नियम तयार नसल्यामुळे अंमलबजावणी ६ ते ७ वेळा पुढे ढकलावी लागलेला आणि अचानकपणे लागू केलेला नागरिकत्व सुधारणा कायदा सुरुवातीपासूनच वादग्रस्त राहिला आहे. पाकिस्तान, बांगला देश, अफगाणिस्तान या तीन मुस्लीम बहुल देशांमध्ये धार्मिक छळामुळे स्थलांतरित होणार्या तेथील अल्पसंख्याक हिंदू, बौद्ध, शीख, पारशी, जैन आणि ख्रिस्ती धर्मीयांना भारतात नागरिकत्वाचा हक्क देणारा हा कायदा आहे. अर्थात, हे नागरिकत्व ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी आलेल्यांनाच मिळणार असले, तरी या यादीत मुस्लिमांचा समावेश नसल्याने अल्पसंख्याकांच्या मनात अढी होती. त्यात राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणीच्या (नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स–एनआरसी) वादाची भर पडल्याने मुस्लिमांमध्ये याबद्दलचा कमालीचा अविश्वास वाढला. नागरिकत्व कायदा आणि नागरिकत्वाची नोंदणी यासाठी कायदेशीर दस्तावेज सादर करावे लागणार आणि कागदोपत्री पुराव्यांअभावी आपल्याला नागरिकत्व गमवावे लागणार, या मुस्लिमांमध्ये वाढलेल्या भीतीचे निराकरण ‘सबका विश्वास’ घोषवाक्य सांगणार्या सरकारला समाधानकारकरीत्या करता आले नाही. हा कायदा धार्मिकतेच्या आधारावर नागरिकत्व देतो आणि राज्यघटना मात्र नागरिकत्व देताना धार्मिक आधाराला स्थान देत नाही. या कारणाखाली नागरिकत्व सुधारणा कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. पाकिस्तानात मुस्लीम न मानल्या जाणार्या आणि धार्मिक छळाला सामोरे जाणार्या अहमदिया किंवा अफगाणिस्तानमधील हाजरा यासारख्या समूहांना भारतात नागरिकत्व का मिळणार नाही, नागरिकत्व कायद्यातील धार्मिक अल्पसंख्याकांमध्ये श्रीलंकेतील हिंदू तामिळांचा समावेश का नाही, हे प्रश्न संसदेत नागरिकत्व सुधारणा विधेयकावरील चर्चेदरम्यान विरोधकांकडून उपस्थित झाले होते. परंतु, त्यांची तार्किक उत्तरे मिळाली नव्हती. यातून शाहीनबागसारखे दीर्घकाळ चाललेले आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेले आंदोलन उभे राहून कायदा– सुव्यवस्थेसारखे अन्य प्रश्न निर्माण झाले होते. याशिवाय आसामसारख्या ईशान्य भारतातील राज्यांमध्ये, पश्चिम बंगालमध्ये या कायद्यामुळे निर्माण झालेले संशयाचे वातावरण असा इतिहास असताना आता हा कायदा लागू होताच त्यावरून पुन्हा गोंधळ निर्माण होईल, हे अपेक्षित होते आणि झालेही तसे! हा कायदा म्हणजे नागरिकत्वाच्या प्रश्नांचे उत्तर आहे, हा सरकारचा दावा असला, तरी त्यातून इतर प्रश्न समोर आले आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवरही विशेषतः सामरिक आणि आर्थिक क्षेत्रात भागीदार असलेला मित्र देश अमेरिकेची नागरिकत्व सुधारणा कायद्याबाबतची आलेली प्रतिक्रिया भारताला न रुचणारी आहे. भाजपेतर पक्षांची सत्ता असलेल्या पश्चिम बंगाल, केरळ आणि तामिळनाडूसारख्या राज्यांनी नागरिकत्व सुधारणा कायदा आपल्या राज्यात लागू केला जाणार नाही, अशी घोषणाही केली आहे. मुळात तसे करण्याचा त्यांना घटनात्मक अधिकार आहे काय, हाच मूलभूत प्रश्न आहे. कारण, घटनेनुसार नागरिकत्व सुधारणा कायदा हा पूर्णतः केंद्रीय यादीतला असल्याने राज्ये त्याला विरोध करू शकत नाहीत. फार तर ते सर्वोच्च न्यायालयात कायद्याला आव्हान देऊ शकतात. केरळ सरकारने अशी आव्हान याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केलीच आहे. दुसरीकडे केंद्र सरकारचाही दावा आहे की, हा कायदा कोणत्याही नागरिकांचे नागरिकत्व हिरावून घेणारा नाही आणि केंद्रानेही या कायद्यासाठी केलेल्या नियमांमध्ये राज्य सरकारांचा हस्तक्षेप कायदा अंमलबजावणीत अजिबात राहणार नाही, याची पुरती दक्षता घेतल्याचेही सांगितले जाते. असे असताना यासारख्या घटनात्मक बाबींवर केंद्र आणि राज्यांमध्ये वाढणारा अविश्वास संघराज्य व्यवस्थेला त्रासदायक ठरणार नाही काय, हा महत्त्वाचा मुद्दा आहेच. याला जोडून निवडणुकांवर नागरिकत्व सुधारणा कायद्याचा काय परिणाम होतो, हेही बघावे लागणार आहे.

# शिवराय ते भिमराय समता मार्च महाड

छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या दोन महामानवांना देव करून त्यांचा फक्त जयजयकार करण्याचे काम आर एस एस प्रणित भाजप,संस्था,संघटना,शिवसेना मनसेच्या भटा ब्राम्हणांनी चालविले आहे.त्यात मराठा व महार बौद्ध समाज अलगत अडकत चालला आहे.या दोन्ही महापुरुषांच्या क्रांतिकारी विचाराला आणि कार्यप्रणालीला मूठमाती देऊन जातीजातीत बंदिस्त करण्याचे काम वस्ती पातळीवर जोरात सुरू आहे.चवदार तळे महाडच्या सत्याग्रहातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या खांद्याला खांदा लावुन उभे राहिलेले सहकारी गंगाधरपंत सहस्त्रबुद्धे, अनंतराव विनायकराव चित्रे,सुरबा नाना टिपणीस,प्रधान बंधु,संभाजी तुकाराम गायकवाड,सुभेदार विश्राम सवादकर,आर बी मोरे,शिवराम जाधव,सी ना शिवतरकर, पा न राजभोज,एन टी जाधव हे मुख्य सहकारी होते.यांना ही त्यांच्या जाती बांधवांनी संघटनांनी ब्रहिस्कृत केले होते.त्यावेळी दर्याखोऱ्यातील सर्व जाती पातीच्या मावळ्यांना एकत्र करून रायगडावरून स्वराज्याचा कारभार करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोकणातील महाड चवदार सत्याग्रहाची किती झळ पोहचली होती.

शिवरायांच्या रयतेच्या राज्यात जातीव्यवस्था तीव्र नव्हती. नंतरच्या काळात पेशव्यांनी शुद्रा अतिशूद्रांचे जिने हराम केले. त्यात सार्वजनिक ठिकाणी पिण्याचे पाणी मिळत नव्हते.म्हणूनच महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला.हा चवदार तळ्याचा इतिहास नव्याने सांगण्याचे काम विचारांचा जागर व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी विविध संस्था संघटनांच्या किर्याशील कार्यकर्त्यानी संकल्प जाहीर केला आहे.१९ मार्च १९२७ ला महाड मध्ये काय घडले होते त्यात कोण कोण सहभागी होते. त्यांची आठवण म्हणून २०१८ ला रायगड पाचाड ते महाड चवदार तळे समता मार्च निघाला होता.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९ व २० मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्यावर समताधिष्ठित बहुजन समाजासाठी सत्याग्रह केला.यंदा या सत्याग्रहाला ९७ वर्ष पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने दरवर्षा प्रमाणे या ही वर्षी लाखो लोक महाडला दर्शनासाठी येत असतात.



१९ मार्च २०१८ ला रायगड पाचाड ते महाड चवदार तळे समता मार्च निघाला होता.२० मार्चला लाखो लोक दरवर्षी येतात,पण १९ मार्चला काय झाले होते यांची माहिती घेत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी आजच्याच दिवसी २० मार्च १९२७ साली चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि तळ्याचे पाणी सर्व मानवजाती साठी खुले केले.केवळ महार जातीसाठी चवदार तळे नव्हते.डॉ बाबासाहेबाच्या क्रांतिकारी विचाराने चवदार तळाच्या पाण्याला हात लावताच आग लागली. ती महाड मध्ये सुरु झालेली आग राज्यातून देशभर पसरली.ते क्रांतिकारी वैचारिक संघटन कैशल्य आज कोणत्याही नेत्याकडे नाही. शिवराय ते भिमराय समता मार्च १९ मार्च २०१८ ला रायगड पाचाड ते महाड चवदार तळे समता मार्च निघाला होता.त्यात मराठी साहित्य संमेलनात क्रांतिकारी विचार मांडून वैचारिक खळबळ निर्माण करणारे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख,माजी मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष सकाळ समूहाचे मुख्य संपादक उत्तम कांबळे,प्रा.अंजली मायदेव कर्वे इन्स्टिट्यूट पुणे,फारूक अहमद सुराज्य सेना प्रामुख्याने उपस्थित राहिले होते.

१९ मार्च १९२७ च्या सत्याग्रहात ज्यांनी सहभाग नोंद विला होता त्यांचे नातु पणतू पण सहभागी झाले होते.त्यात उल्का महाजन,मधुकर गायकवाड,मिलिंद टिपणीस,श्रीप्रकाश अधिकारी,आरिफ करंबेळकर,सुभाष वारे,युवराज मोहिते,अनिता पगारे,ललित बाबर,सुरेश सावंत,अविनाश कदम,भूषण सिसोदे,नागेश जाधव, कालीदास राेटे,प्रदिप शिंदे,सागर तायडे असे विविध संस्था संघटनेचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.आणि एक नवी वैचारिक चर्चा घडविण्याचा प्रयत्न झाला होता.२०२४ ची लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यामुळे शिवराय ते भिमराय समता मार्च महाड चवदार तळे ही वैचारिक चर्चा खेड्यापाड्यात सुरू झाली पाहिजे. कारण महाराष्ट्रातील सत्तातरांत शिवसेनेचे शिवसैनिक आणि राज ठाकरे यांची मनसे सैनिक,राष्ट्रवादीचे मराठा सैनिक यांना आता खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे स्वराज्य याची वैचारिक ओळख झाली असावी कारण त्यांना काल पर्यंत गोब्राम्हण पतीपालक शिवाजी शिकविला गेला होता. सर्वजाती धर्मावर निस्वार्थ प्रेम करणारा रयतेचा राजा त्यांना कधी सांगितला गेला नव्हता.म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजाच्या नांवाचा वापर करून आणि आशीर्वाद घेऊन मोदी केंद्रात सत्ताधारी झाले आणि देवेंद्रने राज्यात मराठा वतनदार जात दांडगे,धन दांडगे यांच्यात ई डी ची भीती घालून उभी फुट पडली. त्यामुळेच शिवराय भिमराय यांच्या विचारांची गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे. त्यासाठीच महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा एका जाती धर्माचा राज्याचा इतिहास नाही तर एकूण मानवाच्या मुक्तीचा सत्याग्रह होता. हे आजच्या तरुण पिढीने लक्षात घेतले पाहिजे. हाच शिवराय ते भिमराय समता मार्च महाड आहे.

मराठा समाजाच्या तरुणाच्या डोक्यात मुस्लीम तिरस्कार प्रचंड भरला गेला होता.त्यांच्या हाताखाली ओबीसी मागासवर्गीय तरुण कायमस्वरूपी तोडफोड दंगली करण्यासाठी वापरला जात होता. चवदार तळ्याच्या सत्याग्रहात रायगड पाचाड ते महाड मधील सर्व मावळा सहभागी होता.रायगडाच्या कोकणातील सुपीक जमिनीत जातीजातीचे बीज छत्रपती शिवाजी महाराज आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांनी कधीच येऊ दिले नव्हते. दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या बारा बुलतेदाराना निसर्गाचे पाणी पिण्यासाठी कुठे ही संघर्ष करावा लागला नव्हता हा इतिहास आहे.मग महाडच्या चवदार तळ्याचे पाणी किंवा राज्यातील सर्वच सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा हक्क नाकारणारे कोण होते.हा इतिहास शिवसैनिक मनसे सैनिकांनी वाचणे खूप आवश्यक आहे. शिवराय ते भीमराय समता मार्च चवदार तळे ही वैचारिक चर्चा घडवून आणली पाहिजे.आपण सहभागी होऊ शकत नसलो तरी यावर व्यापक चर्चा घडवुन शिवराय ते भिमराय समता कशी प्रस्थापित करता येईल यांचा विचार करूया. कोणती ही दळणवळणाची साधन नसतांना ज्यांनी या सत्याग्रहात सहभाग घेऊन यशस्वी संघर्ष केला त्या सत्यगृहींना कोटी कोटी प्रणाम!!!.




***********

**सागर रामभाऊ तायडे**
**,९९२००३८५९**
**भांडुप,मुंबई.**

# बेरोजगारांचा मोरक्या म्हणजे नेता

निवडणुकीचे वारे वाहताच राजकीय पक्ष, सामाजिक संघटना व त्यांचे नेते खडबडून जागे होताना दिसत आहेत. राजकारण व सामाजिक क्षेत्रात लोकहीताचे सोंग करून स्वहित साधणारे आणि जात, पात, धर्म, महापुरुष, विचारधारा यांना भांडवल बनवून लोकांना भावनिक करणारे सर्व लोक सारखेच गुन्हेगार आहेत. राजकारण हे लोकविकासाचे अत्यंत महत्वाचे माध्यम आहे असे, लोकविकास व प्रगतीचे दार उघडण्याची महत्वाची चाबी आहे असे डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे. परंतु ज्या महामानवाने उदार मनाने आपल्या शिक्षणाचा व बुद्धीमत्तेचा वापर हा लोकविकास व देशाच्या कल्याणासाठी खर्ची करून सामाजिक विकासासाची क्रांती करणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य राजकारण व समाजकारण दिसत नाहीत. बाबासाहेब आंबेडकर यांचा फक्त फोटो लावणे व नावाचा उल्लेख करणे म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य मान्य करून त्यांना अपेक्षित राजकारण व समाजकारण केले जाते असे मुळीच नाही. आपण आपण बघतो आहोत की, सामाजिक समस्या वाढून दिवसेंदिवस जटील होत आहे. लोकविकासाच्या नावाने हजारो करोडो रुपयांचा निधी सर्व नेते एकत्र येऊन लुटत आहेत. शाळा, दवाखाने बांधने तर सध्या बंदच झाले आहे परंतु काही ठिकाणी रस्ते, पुल बांधण्याचे दाखवले जात आहे. परंतु त्या बांधलेल्या पुलांची, रस्त्याची गुणवत्ता काय आहे हे सर्वांनाच माहिती आहे. हजारो करोडो रुपये खर्च करून समृद्धी महामार्ग तयार केला जातो सर्वात सुरक्षित व वेगवान रस्ता म्हणुन जाहिरात केली जाते. परंतु रस्त्यावर सरासरी रोज होणाऱ्या अपघाताला नेमकं जबाबदार कोण हे शोधून काढले जात नाही. एवढेच नाही तर मजबूत व सुरक्षीतेची जाहिरात करूनही समृद्धी महामार्गा सारख्या रस्त्यावरील पुलाला जर भले मोठे छिद्र पडून रस्ता वापरणे धोकादायक असेल तर ते काम किती प्रामाणिक झाले असेल याचे उत्तम उदाहरण आहे. हे फक्त उदाहरण आहे. समृद्धी सारख्या राजमार्गाची हि परिस्थिती असेल तर छोटे मोठे रस्ते कसे असतील हे लोकांना चांगले माहिती आहे. ब्रिटीशांनी भारताला लुटले आणि रस्ते, पुल व इतर इमारती बांधल्या आजही ब्रिटीश कालीन बांधकामे आम्ही कोणत्याही प्रकारचा डागडुजी वर खर्च न करता वापरत आहोत. परंतु भारत सरकारने इमानदारीने देशाच्या प्रगती साठी बांधलेले बांधकाम काम सुरू असतानांच पडल्याचे आपण बघतच आहेत. हे कशामुळे होते तर प्रत्येक बाबतीत राजकारण केल्याने व प्रत्येक कामात टक्केवारी वाढल्याने. निकृष्ट दर्जाच्या कामाला राजकीय नेते, पक्ष जबाबदार आहेतच पण सामाजिक संघटना सुद्धा जबाबदार आहेत. कारण प्रत्येक जन स्वतः ला नेते म्हणून सिद्ध करताना प्रत्येक कामात अडथळा निर्माण करून लोकशाही मधील हक्क अधिकार याचा दुरुपयोग करून, मांडवली च्या नावाखाली स्वतः चे घर भरण्याची संधी कोणीच सोडत नाही. आज नेता व्हायला काहीच लागत नाही. भडक, भावनिक व द्वेष पसरवून चुकीचे बोलणारा आणि बेरोजगार तरुणांना सोबत घेऊन चहा पाण्यावर खुश करणारा व्यक्ती आज नेता बनु शकतो. राजकीय नेते हे बहुतेक वंशपरंपरेने व त्यांच्या च ओळखीने झालेले असतात. बाकीचे नेते हे महापुरुष, जात, धर्म याला भांडवल बनवून तयार होतात. नेत्यांच्या दहा पिढ्यांच्या समस्या सुटलेल्या आहेत. राजकीय नेत्यांचा विचार केला तर आमदार खासदार आजी असो की माजी त्यांच्या मतदारसंघासह इतरही त्यांच्या शेतजमीन, शाळा, बँका, हॉटेल, आपल्याला बघायला मिळतील. नेत्यांचे मुलं काहीच काम करत नाहीत तरीही ते करोडपती असतात. कार्यकर्ते मात्र चटया उचलण्यासाठी लोकांकडून उसने पैसे घेऊन जातात. नेत्यांचे मुलं विदेशात जाऊन शिक्षण घेतात, कार्यकर्त्यां जवळ शाळेची फि भरायला पैसे नसतात तरीही कार्यकर्ता जात, धर्म, महापुरुष किंवा विचारधारेशी इमानदार राहुन नेत्याचे नेतृत्व स्विकारतो. नेता हा लुटारू व भ्रष्टाचारी आहे आणि आपला तो फक्त वापर करून घेत आहे हेच कार्यकर्यांच्या लक्षात येत नाही. ज्यांना वंशपरंपरागत किंवा लाचारी करूनही राजकीय नेता होता आले नाही असे लोक महापुरुष, विचार, जात धर्म, याविषयी भडकाऊ बोलुन बेरोजगार तरुणांच्या मदतीने स्वतः ला सामाजिक नेता घोषित करण्याचा प्रयत्न करतात. सामाजिक नेते सुरवातीला पैदल फिरतात पण बेरोजगार युवकांना सोबत घेऊन सरकारी कार्यालये, पोलीस स्टेशन येथे जाऊन नेता होता होता ते आर्थिक संपन्न होतात. दोन तिन वर्षात काही काम न करता त्यांच्या कडे पैसे येतात, गाडी येते, बेरोजगार तरुणांना मात्र नेत्या सोबत जाताना दुसऱ्याच्या गाडीत पेट्रोल टाकण्यासाठी आई वडिलांकडून पैसे घ्यावे लागतात हि खंत आहे. सामाजिक नेता एकेकाळी चहा साठी महाग होता तो काहीच काम न करता गाडीने कसा फिरतो याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न बेरोजगार तरुण करत नाहीत. आणि ज्यांनी ह्या प्रश्नाचे उत्तर शोधले तो कधीच नेत्याच्या जवळ जात नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे अगोदर तरुणांनी आपल्या पोटापाण्याचा प्रश्न मार्गी लाऊन समाजकारण आणि राजकारण करावे. उपाशी पोटी चळवळ होत नाही आणि करूनही नाही. आता आपण प्रामाणिक पणे विचार केला तर लोकशाही चे गोडवे गाणारे राजकीय पक्ष व नेते यांच्या कडे किती कार्यकर्ते असे असतील कि त्यांना महागाई, दुष्काळ व इतर समस्येची झळ न लागता कुटुंबातील सदस्यांचा वैद्यकीय उपचार मोठ्यात मोठ्या रुग्णालयात करू शकतात. ह्या प्राथमिक गरजा पुर्ण असलेले किती कार्यकर्ते असतील? सामाजिक संघटना व सामाजिक नेते जे महापुरुष, संविधान, हक्क अधिकार याबाबत जागृती करण्याचे सोंग करत आहेत व आम्हाला सर्व काही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच मिळालेले आहे. म्हणून आम्ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या च विचाराचे काम करून समाजात जागृती निर्माण करतो असे बोलणारे स्वंयघोषीत नेत्यांच्या टोळीत बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानुसार किती कार्यकर्ते कमवणारे आहेत? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन फक्त त्यांच्या नावाचे भांडवल बनवून लोकांना भावनिक बनवून स्वतः चे नेतृत्व बेरोजगारांवर लादणे एवढेच काम इमानदारीने केले जात आहे. स्वतः ला निरपेक्ष समजणारे, लोकशाही व संविधानाला माणतात याचे सोंग करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने व संविधानीक पद्धतीने वागत नाही तेव्हा समजते हे नेते समाजासाठी, सामाजिक समस्या सोडवण्यासाठी झाले नाहीत तर स्वतः चे घर भरण्यासाठी व नसलेला मान सन्मान व पद टिकवण्यासाठी झालेले आहेत. आणि यासाठी यांना बेरोजगार व भावनिक लोकांची गरज असते. आणि असे लोक लवकरच भक्त बनत असतात. आज नेता बनण्यासाठी कर्म महत्त्वाचे नाहीत तर भक्त महत्त्वाचे आहेत. दोन चार जरी भक्त तयार झाले तरीही ते नेत्याची भक्ती करत फिरतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या विरोधी व संविधान विरोधी शक्ती येथे काम करत आहेत, सुशिक्षित बेरोजगार तरुणांचे लक्ष विचलित करून जाती धर्माच्या आधारावर तरुणांना भडकवून जनतेचा पैसा जनतेच्या विरोधात वापरला जातो असे काही जन म्हणतात परंतु असे म्हणणारे लोक जनतेकडून वर्षभर पैसे गोळा करून त्याचा हिशोबही देत नाहीत आणि बेरोजगारांच्या भल्या साठी खर्चही करत नाहीत अशा लोकांत आणि संविधानाच्या विरोधात खर्च करणाऱ्यां मध्ये काय फरक आहे? सत्ताधारी नेत्यांचे काही लोक भक्त आहेत पण सामाजिक संघटनेमध्येही भक्तांची निर्मिती होऊन कार्यकर्ते स्वतः बेरोजगार असुन नेत्यांना मात्र वर्गणी, निधी आणि मांडवलीच्या माध्यमातून नेत्यांना श्रीमंत केले जाते आणि कार्यकर्ते हे तत्व, इमानदारीने वर कायम राहुन घरी उपाशी राहतील पण नेत्यांचे काम करतील. नेते जनतेकडून आणि जनतेच्या नावाखाली वेगवेगळ्या ठिकाणी मांडवली करून, स्वतः चे इमान व प्रतिष्ठा गहाण टाकुन स्वतः ची आर्थिक भरभराट करून घेत आहेत. म्हणून आज शिक्षण, आरोग्य, रोजगार व इतर मुलभूत सुविधा ही सर्व सामान्य लोकांना मिळत नाही पण बेरोजगार तरुणांच्या जोरावर नेते मात्र ढाबे, बार जाऊन बसतात आणि गाडीने फिरतात. याचे मुख्य कारण म्हणजे आजचे नेते हे बेरोजगार तरुणांच्या जोरावर रोजगार मिळवणारा हुशार माणूस म्हणजे नेता होय. कार्यकर्ते यांनी डोळस होऊन सामाजिक विकासासह देशाचा विकास करण्यासाठी जात धर्म व महापुरुषांचे भांडवल न करणारा पण शिक्षण, संरक्षण, आरोग्य, महागाई यासाठी जनमत लक्षात घेऊन काम करणाऱ्या लोकांच्या पाठीशी उभे राहुन त्यांना खऱ्या अर्थाने प्रोत्साहन देणे म्हणजे जागृत नागरिकांचे लक्षण होय.

***********

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# समतेच्या लढ्यातील दुर्लक्षित नायक– गोपाळबाबा वलंगकर

आद्य समाज सुधारक गोपाळबाबा वलंगकर सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा फुले यांचे सहकारी आणि अस्पृश्य समाजातील आद्य समाजसुधारक गोपाळवावा वलंगकर यांनी सामाजिक विषमते विरुध्द बंड करून मानवी हक्कामाठी आंबेडकरपूर्व काळात सामाजिक समतेची चळवळ सुरु केली. आंबेडकपूर्व काळात १८६० पासून त्यांनी समाजाला संघटीत करुन अम्गृश्यतमूळे होणा–या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले. सन १८८६ मैन्यातील हवालदार पदाची नोकरीचा राजीनामा देऊन सामाजिक क्रांतीच्या लढ्यात स्वतःला वाहून घेतले. सन १८८८ साली विनंती पत्र या छोटेखानी पुस्तिकेतून प्रस्थापित समाजव्यवस्थेला प्रश्न विचारण्याचे धाडस करतात.अस्पृश्य समाजाचे पहिले सामाजिक संघटन अनार्यदोषपरिहारक मंडळ स्थापन करुन अस्पृश्य मुलांच्या शाळा प्रवेशासाठी इंग्रज सरकारकडे दाद मागितली, सार्वजनिक पाणवठे अस्पृश्यांना खुले करण्यात यावे, धर्मशाळेमध्ये अस्पृश्यांना प्रवेश असावा तसेच अस्पृश्यांची लष्कर भरती बंदी उठवून त्यांना पूर्वरत लष्करात प्रवेश मिळावा यासाठी चळवळ सुरु केली, महाड लोकल बोर्डाचे सदस्य म्हणून वंचिताचे हक्क मिळवून देण्याचे कार्य केलं. दीनबंधू, ज्ञानोदय, सुधारक, सुबोध पत्रिका इत्यादी तत्कालीन वृत्तपत्रातून त्यांनी लिखाण करुन सामाजिक समतेची लढाई प्रस्थापित करण्यासाठी कार्य आजीवन केले. अशा या आद्य विद्रोही सुमाजसुधारक, विद्रोही पत्रकार, सपादक साहित्यिक, प्रबोधनकार लोकनेते गोपाळबाबा वलंगकर यांच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विशेष आदर वाटत असे. म्हणून मुकनायक दिनांक २५ सप्टेंबर १९२० च्या अंकात आणि महाड चवदार तळे सत्याग्रह दिनाक १९ मार्च १९२०च्या क्रांतीसंगरातील अध्यक्षीय भाषणात डॉ. आबेडकर गोपाळबाबाच्या कार्याचा जाहीर गौरव करून त्यांच्या कार्यास, आणि स्मृतीस अभिवादन करतात. पुढे दिनांक ०६ फेब्रुवारी १९३७ साली मुंबई विधी मंडळ निवडणूकीत स्वतंत्र मजूर पक्षाचे कुलाबा जिल्हा उमेदवार असलेल्या सुभेदार विश्राम सवादकर यांच्या प्रचार सभेचा शुभारंभ गोपाळबाबाच्या समाधीस रावढळ मा. महाड येथे जाऊन अभिवादन करतात.वलंगकरांची जन्मभूमी जरी कोकणातील रावढळ (ता. महाड) असली तरी त्यांची कर्मभूमी संपूर्ण महाराष्ट्र होती . कोकणातील दापोली पासून मुंबई, पुणे, सातारा ते विदर्भातील अकोला, अमरावती, नागपुर, भंडाऱ्यापर्यंत त्यांनी ठिकठिकाणी प्रवचने देऊन जागृती केली . महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अनार्यदोष परिहारक मंडळीच्या शाखा स्थापन केल्या.त्यांच्या या दौऱ्यास खुर म. जोतीराव फुले आर्थिक सहकार्य करत असत.मानवमुक्तीची, सामाजिक समतेची चळवळ म्हणून आज आंबेडकरी चळवळ देशात फोफावली आहे. इतकेच नव्हे तर विदेशातही अलिकडे आंबेडकरी विचारावर आधारलेल्या समानतेच्या चळवळी उभ्या राहत आहेत. या आंबेडकरी चळवळीची मजबूत पायाभरणी करण्याचे काम गोपाळबाबा वलंगकर यांनी अखेरच्या श्वासापर्यंत केले. ते आंबेडकरी चळवळीचे आधारवड ठरतात. रावढळ (ता. महाड) येथे इसवी २७मार्च १९०४रोजी तापाने निधन झाले. तेथे त्यांची समाधी बांधण्यात आली. सन २००४ मध्ये या समाधीचा जिर्णोध्दार करण्यात आला. जमिनीवर दगडी ओटा बांधून त्यावरून चोकोनी वृंदावना सारखा लाल ओटा बांधला असून त्याखाली संगमवरी प्लेट वर लेख कोरला आहे.पून्हा सन २०२० मध्ये समाधीवरील जुनी पत्र्याची छत्री बदलून नूतनीकरण करण्यात आले. त्यांच्या निर्वाणाला या वर्षी १२० वर्ष पूर्ण होत होत असून असून प पुढील ५ वर्षानी म्हणजे सन २०२९मध्ये १२५ वर्ष पूर्ण होतील. सामाजिक समतेच्या लढ्यातील अशा या थोर पुरुषांच्या कार्याचे स्मरण येणा–या पिढीला व्हावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीने पुढाकार घेऊन १९मार्च रोजी रावढळ येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित केला आहे.अभिवादनसाठी १९मार्च ही तारीख निवडण्याचे मुख्य कारण म्हणज दि. १९ मार्च १९२७ रोजी महाड येथे झालेल्या चवदार तळे सत्याग्रहाच्या ऐतिहासिक भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गोपाळबाबांच्या कार्याचा गौरव करुन समाजात झालेल्या जागृतीचे सर्व श्रेय त्यांना देवून अभिवादन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील ही घटना अत्यंत महत्वपूर्ण आहे.२०मार्च रोजी महाड येथे क्रांती स्तंभ आणि चवदार तळे येथे महाराष्ट्रासह अनेक राज्यातील आंबेडकरी अनुयायी अभिवादनासाठी येतात. महाड येथे येणारे अनुयायी अलिकडच्या काळात रावढळ येथे जाऊन वलंगकर यांच्या स्मारकास अभिवादन करण्यासाठी येऊ लागली आहेत. यामध्ये अनेक अभ्यासक, विचारवंत, संशोधक आणि सामाजिक कार्यकर्ते यांचा समावेश आहे.

सन १८८६साली सैन्यातील हवालदार पदावरुन निवृत्ती घेतलेलं गोपनाक विठ्ठनाक साळवी अर्थात गोपाळबाबा वलंगकर दोपाली येथे काही काळ स्थायिक होतात. दासगाव येथील विठ्ठल हाटे या महार गृहस्थाने बांधलेल्या लाकडी माडीच्या प्रकरणामुळे आपल्या समाजावर होणाऱ्या अन्यायाचे खंडण करण्यासाठी सन १८८८ साली त्यांनी ५४ पानाचे विनंतीपत्र लिहून त्यात २६ प्रश्न हिंदूधर्माच्या शंकराचार्य, साधुसंत, विद्वान ब्राम्हण यांना विचारुन याची उत्तरे ६ महीन्याच्या आत द्यावी अशी मागणी या पुस्तिकतून केली आहे. १८८९ ते ९० साली अस्पृश्य (महार, मांग, चांभार) समाजातील दोष दूर करण्यासाठी त्याना शिक्षणाची गोडी लावण्यासाठी तसेच आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द संघटितपणे आवाज उठविण्यासाठी अनार्यदोष परिहारक मंडळी नावाच्या सामाजिक संस्थेची स्थापना करुन महाराष्ट्रात ठिकठिकाणी तीच्या शाखा उघडल्या.सन १८९२ माली कंपनी सरकारने अस्पृश्य सैनिकांना सैन्यातून कायमचे काढून टाकले आणि सैन्यभरती बंद केली. या. घटनेच्या विरोधात अनार्यदोष परिहारक मंडळीच्या माध्यमातून ठिकठिकाणी सभा घेऊन जागृती कली. २४ जुले १८८४ साला इंग्रज सरकारला २३ पानी अर्ज लिहून आमच्या शूरवीरानी पूर्वजांनी अनेक लढायात पराक्रम गाजवून इंग्रजाना विजय मिळवून दिला. मात्र इंग्रज सरकारने त्यांनाच सैन्यातून कमी करुन त्यांच्या शी विश्वासघात केला. या अन्याया विरोधात त्यांनी निवेदन लिहून देऊन वेगवेगळ्या नावाने, वेगवेगळ्या ठिकाणाहून सरकारकडे पाठवून दाद मागण्याचा प्रश्न केला.

सन १९९५ मध्ये पुण्यात भरलेल्या न्यायमूर्ती रानडे यांच्या सामाजिक परिषदेमध्ये त्यानी हृदय हेलावून सोडणारे भाषण केले अस्पश्यांना सार्वजनिक तळे , विहीरी, पानवठे खुले करण्यात यावे, धर्मशाळेत प्रवेशासाठी बंदी नसावी तसेच इतर समाजाच्या मुलांप्रमाणे वर्गात बसून अस्पृश्याच्या मुलाना देखील शिक्षण घेता यावे,अस्पृश्यातील शिकलेल्या,योग्य कर्तबगार तरुणाना सैन्यदल, पोलिस, महसुल, बांधकाम, रेल्वे इत्यादी खात्यात नोकऱ्या मिळाल्या पाहीजे अशी मागणी कली.

सन १८९५ मध्ये पुण्यात झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशात त्यांनी एक प्रश्नावली पाठवून निर्भीडपणे जाब विचारला. अस्पृश्याच्या जीवनात काडीचा ही बदल व्हावा अशी तुमची इच्छा नाही. मग तुम्हाला राजकीय सुधारणा मिळाव्यात अशी सरकारकडे मागणी करण्याचा काय अधिकार आहे? असा परखड सवाल त्यांनी केला. सन १८९५ रोजी इग्रज सरकारने त्याना महाड लोकल बोडांचे सरकार नियुक्त सदस्य म्हणून नेमले. २० मार्च १८९५ रोजी गोपाळबाबा यांनी लोकल बोर्डाच्या पहिल्या सभेत ठेवलेले पहिले पाऊल म्हणजे अस्पृश्य समाजाच्या राजकीय प्रतिनिधीत्वाची नांदी होय.



मात्र आम्ही धेडाच्या मांडीला मांडी लावून सभेत बसणार नाही अशी भूमिका घेऊन सवर्ण सदस्यांनी या सभेवर बहिष्कार घातला. पुढे अडीच तिन वर्षपर्यंत हा बहिष्कार असाच कायम होता. गोपाळबाबांच्या सदस्य पदाला आव्हान देत सवर्ण सदस्यांनी खूप विरोध केला. मात्र ते डगमगले नाही. तत्कालीन वृत्तपत्रातून त्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे आणि परखडपणे मांडली.इंदूप्रकाश, सुधारक, दीनबंधू, सुबोध पत्रिकेसारखी अनेक वृतपत्र वलंगकरांच्या बाजूने भक्कमपणे उभी राहीली. अस्पृश्यांच्या न्याय हक्कासाठी गोपाळबाबा यांनी लोकल बोर्डाच्या प्रत्येक सभेतून आग्रह धरला. सार्वजनिक पाणवठे, विहीर, तळे अस्पृश्याना खुली व्हावी, शिक्षणाची समानसंधी मिळावी. सामाजिक विषमता कायद्याने दूर व्हावी यासाठी त्यांनी अनेक ठराव पास करुन घेतले. (त्यानंतर ३० वर्षानी सी. के. बोले यांनी मुंबई विधिमंडळात सार्वजनिक पानवठे अस्पृश्यांना खुली करण्याचा ठराव घेतला. तर ५ जाने. १९२४ रोजी महाड नगरपालिकेने बोले ठरावाची नुसार महाड येथील सार्वजनिक पानवठे अस्पृश्यांना खुली करण्याचा ठराव केला, त्याची अंमलबजावणी २० मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी कली.) मागासवर्गीय समाजाला सर्वप्रथम राजकीय प्रतिनिधीत्व देणाऱ्या गोपाळ बाबा वलंगकर यांच्या कार्यविषयी राखीव जागेतून निवडून जाणाऱ्या आमच्या लोकप्रतिनिधिंना याबद्दल किती माहितीअसेल? डॉ यासाहेब आंबेडकरांचे वडील सुभेदार रामजी सकपाळ हे वलंगकर यांचे सहकारी होत. अ.दो.प. मंडळाचे ते सक्रीय कार्यकर्ते होते.त्यांनी वलंगकर यांचे सर्व लिखाण असलेल्या दीनबंधूआणि इतर वृतपत्राच्या फाईली तसेच अ.दो.प.चा पत्रव्यवहार आणि निवेदने,कागदपत्रे सांभाळून ठेवली. रामजी बाबांनी त्यांच्या ट्रँकेतून डॉ. आंबेडकर यांना वाचायला मिळाली. त्यातून वलंगकराच्या क्रांतीकारी विचाराची आळख त्यांना झाली म्हणून त्यानी २५ सप्टे. १९२० मुकनायकच्या अंकात वलंगकरांच्या गौरव करीत म्हटले आहे की महार जातीचे गुरु हरिभक्त परायण गोपाळबाबा वलंगकर या कोकणस्थ महार साधूने सर्व बहिष्कृत लोकांवरचा अस्पृश्यतेचा डाग माफ धुवून निघून जावा म्हणून सर्व महाराष्ट्रभर फिरून लोकांना उपदेश केला, अनार्यदोष परिहारक समाज ठिकठिकाणी स्थापन केले. सुधारक व दीनबंधू या पत्रातून वारंवार लेख व अखंड लिहिले . (हे अखंड आम्ही सवडीनुसार प्रसिध्द करणार आहोत.) इतकेच नव्हे तर विजयादशमी अश्विन शक १८१० सर्वधारोनाम संवत्सर सन १८८८ या वर्षी ५० पानाचे एक विनंतीपत्र प्रश्नरूपाने छापून जातीभेदावर वादविवाद करण्याकरीता तत्कालीन शंकराचार्य व इतर धर्ममार्तंड यांना आव्हान केले होते.

१९ मार्च महाडच्या क्रांतीलढ्याच्या अध्यक्षीय भाषणात बाबासाहेव म्हणतात की, अस्पृश्योन्नतीची चळवळ प्रथम सुरु केल्याचा गान जर कोणास द्यावयाचा झाला तर तो या संस्थेस आणि या प्रांतास देणे प्राप्त आहे. या संस्थेच्या चालकानी संस्थेच्या मार्फत फक्त अडचणी दूर करण्याचे काम केले असे नाही, लेखनाद्वारे जागृती करण्याचे काम त्यांना पुष्कळच केले. सत्यशोधक समाजाचे अध्वर्यु म. ज्योतीबा फुले यांचे खरे साथीदार व उत्साही शिष्यापेको बरेचसे या संस्थेच्या चालकार्यको एकाच नावाचा उल्लेख केल्याशिवाय माझ्याने राहवत नाही ते गृहस्व म्हणजे के, गोपाळबुवा बलगकर हे होत. त्यानी आपल्या लखनाद्वारे जो जागती केली तो अनुपम आहे. ज्यांना तो पाहावयाची असेल त्यानी दोनबंधूच्या जुन्या फाईल बाचून पाहाव्यात महण में कळेल, मुंबई विधीमंडळाच्या १९३७ च्या निवडणुकीत कुलाबा जिल्हा उमेदवार सुभेदार विश्राम सवादकर यांच्या प्रचाराचा प्रारंभ दिनाक २६ फेब्रु. १९३७ रोजी डॉ. बाबासाहेब आबेडकर रावढळ (ता. महाड) येथे येवून वलंगकरांच्या समाधीला अभिवादन करतात, यातूनच वलंगकर याचांच्या कार्याचे महत्व अधोरेखित होते!

गोपाळबाबा वलंगकरांपासून आपण प्रेरणा घेतल्याचे स्वतः आंबेडकर अनेक प्रसंगातून सांगातात. शिवराम जानवा कांबळे, किसन फागोजी बनसोड, विठोबा रावजी मूनपंडे, गणेश आकाजी गवई, सखाराम फिरोगांजी बाराथे,राघोराम सज्ञन घाडगे, मारोती साबाजी गायकवाड, संभाजी तुकाराम गायकवाड, गणुबुवा जाधव, कॉ. रामचंद्र मोरे अशा अनेक समाजसुधारकांनी वलंग कर यांच्यापासून प्रेरणा घेऊन सामाजिक क्रांतीचे चक्र गतिमान केले.. म्हणून रावढळची भूमी पु प्रेरणाभूमि आहे. बुध्द, कबीर, फुले वलंगकर ते बाबासाहेब आंबेडकर हा सामाजिक न्यायाचा क्रांतीप्रवास अधिक गतिमान आणि सर्वव्यापी होण्यासाठी रावढळ (ता. महाड) येथे गोपाळबाबा वलंगकर यांचे स्मारक प्रेरणाभूमी म्हणून महाराष्ट्र शासनाने विकसित करावे अशी मागणी आबेडकरी समाजाकडून होत आहे.

या दृष्टीने सामाजिक न्यायाच्या लढ्यातील दुर्लक्षित नायक ठरलेल्या गोपाळबाबा वलंगकर यांना अभिवादन करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टीने पुढाकार घेतला ही ऐतिहासिक घटना आहे.

***********

**डॉ. प्रेम हनवते**
**प्रकल्प व्यवस्थापक, संशोधन विभाग**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी)पुणे**
**मो.८८८८८५७४०२**

## ’कोणाच्या जाण्याने कोणाचे अडत नसते...’; बारामतीत सोशल मिडियावर फिरणाऱ्या ’त्या’ फोटोची चर्चा

बारामती: बारामती लोकसभा मतदारसंघातील लढतीकडे देशाचे लक्ष लागले आहे. येथील राजकीय मैदान कमालीचे तापले असून, त्यात सोमवारी (दि. १८) भर पडली ती सोशल मिडियावर फिरणाऱ्या एका फोटोची. वटवृक्ष पालवी फोडत असतो, कोणाच्या जाण्याने कोणाचं अडत नसतं, असा मजकूर या फोटोवर टाकण्यात आला आहे.बारामती लोकसभा मतदारसंघात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार विरुद्ध सुप्रिया सुळे अशीच लढत होणार हे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. अजित पवार यांनी घेतलेल्या भूमिकेचे स्पष्टीकरण एका पत्राद्वारे दिले होते. त्याला एक बारामतीकर या नावे निनावी पत्राद्वारे उत्तर देण्यात आले होते. आता खुद्द अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास व भावजय शर्मिला यांनी शरद पवार यांच्या मागे उभे राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यात या फोटोची भर पडली आहे. सोमवारी बारामतीत श्रीनिवास पवार यांच्या भाषणाची आणि या फोटोचीच चर्चा रंगली. या




फोटोत शरद पवार यांच्यापासून ते त्यांच्या बाजूने कुटुंबातील उभे राहिलेल्यांचा उल्लेख आहे.या निमित्ताने सोशल मिडियावर दोन्ही गटाचे कार्यकर्ते कमालीचे आक्रमक झाले आहेत. एकमेकांचे उणेदुणे काढणाऱ्या पोस्टचा, एखाद्याने एखादी पोस्ट केली तर त्यावर कॉमेंटचा अक्षरक्ष पाऊस पडतो आहे. विशेषतः तरुण पिढी, नव मतदार यात आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे. कुटुंबात एकटे पडणार असल्याचे अजित पवार यापूर्वीच म्हणाले होते. त्याचा प्रत्यय आता येवू लागला आहे.

## आम्हाला बोलायला लावू नका!

नवी दिल्ली : एससीबीएचे अध्यक्ष आणि वरिष्ठ वकील अधीष अग्रवाल यांना सुप्रीम कोर्टाने फटकारले असून अधीष अग्रवाल यांनी सुप्रीम कोर्टाने निवडणूक रोख्यांसंदर्भात दिलेल्या निकालावर आक्षेप घेतला होता. यासंदर्भात त्यांनी आधी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू याना पत्र लिहिले होते. त्यानंतर त्यांनी देशाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांना देखील पत्र लिहिले होते.सरन्यायाधीश म्हणालेत की, तुम्ही आम्हाला निवडणूक रोख्यांसंदर्भात घेतलेल्या निकालाचा पुनर्विचार करण्यास सांगत आहात. हे सर्व काही प्रसिद्धसाठी सुरु असल्याचे आम्हाला दिसत आहे. त्यामुळे यात लक्ष घालावे असे आम्हाला वाटत नाही.तुम्ही एक वरिष्ठ वकील आणि एससीबीएचे अध्यक्ष आहात. तुम्ही पत्र लिहून माझ्या सू मोटोच्या अधिकारांना आव्हान दिले आहे. हे सर्व प्रसिद्धीसाठी सुरु आहे. त्यामुळे आम्ही यात लक्ष घालणार नाही. मला आणखी काही बोलायला लावू नका. कारण, ते सन्मानजनक नसेल असे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी अग्रवाल यांना म्हटले आहे. अधीष अग्रवाल यांनी यापूर्वी द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहिले होते. सुप्रीम कोर्टाचा निवडणूक रोख्यांसंदर्भात देण्यात आलेला निर्णय अयोग्य आहे.

## पुण्यातील चौथा उमेदवार कोण?


पुणे : प्रतिनिधी पुणे जिल्ह्यात चार लोकसभा मतदार संघाचा समावेश असून आजवर केवळ तीन उमेदवारांची घोषणा झाली आहे. त्यामध्ये पुण्यातून महायुती आणि बारामती व शिरूर मतदार संघातून महाविकास आघाडीच्या उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. त्यामुळे अन्य मतदार संघातील संभाव्य नावाबाबत तर्क वितर्क करण्यात



येत आहेत.पुणे लोकसभा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार आणि भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ तर बारामती लोकसभा मतदार संघासाठी विद्यमान खासदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष –शरद पवार गट सुप्रिया सुळे ,आणि शिरूर लोकसभा मतदार संघात विद्यमान खासदार डॉ.अमोल कोल्हे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे त्यामुळे संभाव्य उमेदवारीबाबत चर्चा सुरू आहे. कोणाला उमेदवारी मिळणार याबाबत याकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले आहे.जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदार संघाचा विचार करता येत्या ७ मे रोजी बारामती लोकसभा मतदार संघ आणि पुणे,मावळ ,शिरूर येथील मतदान १३ मे रोजी होणार आहे. त्यामध्ये पुणे–२० लाख ३ हजार ३१६,मावळ –२५ लाख ९ हजार ४६१,शिरूर– २४ लाख ७९ हजार ७४२ आणि बारामती लोकसभा मतदार संघात २३ लाख १५ हजार ९६८ मतदार आहेत याखेरीज चार लोकसभा मतदार संघात एकूण ८३८२ मतदान केंद्र असणार आहेत.

# बर्ड फ्ल्यूची भीती नको पण काळजी आवश्यक

मार्च महिन्याच्या पहिल्या आठवडयात नागपूर येथील प्रादेशिक अंडी उबवणी केंद्रातील मृत कोंबड्यांमध्ये बर्ड फ्लू आजाराचा एच ५ एन १ हा विषाणू आढळल्याचे प्रयोगशाळा तपासणी वरून निश्चित झाले आणि राज्यात पुन्हा एकदा बर्ड फ्ल्यूची चर्चा सुरु झाली. इन्फ्ल्युएंझा विषाणूचे नैसर्गिक घर म्हणजे पाणपक्षी. बदक आणि त्यासारखे पाणपक्ष्यांच्या शरीरात हा विषाणू राहतो. या पाणपक्ष्यामध्ये या विषाणूचा प्रादुर्भाव मुख्यत्वे आतड्याला होतो. बदक आणि इतर पाणपक्षी हे या विषाणूचे मूळ यजमान नंतर या मूळ यजमानाकडून हा विषाणू मध्यस्थ यजमानाकडे म्हणजे कोंबड्या किंवा डुक्कर यांच्याकडे या विषाणूचा प्रवास होतो आणि तेथून मग तो माणसाकडे येतो.१८७८ मध्ये बर्ड फ्लू हा आजार प्रथमतः शेतावर पाळल्या जाणाऱ्या काही पक्ष्यांमध्ये आढळला. १९५९ ते १९९५ मध्ये पोल्ट्री मधील पक्ष्यांमध्ये बर्ड फ्ल्यू आढळण्याच्या पंधरा घटना जगभरात नोंदवण्यात आल्या तर १९९६ ते २००८ या कालावधीमध्ये अशा प्रकारच्या अकरा घटना घडल्या. १९९० नंतर जगभरातील पोल्ट्री मधील पक्ष्यांचे प्रमाण ७० टक्क्यांनी वाढले त्यामुळे स्वाभाविकच बर्ड फ्लू उद्रेकाचे प्रमाणही वाढले. १९९६ मध्ये चीनमध्ये प्रथमतः इन्फ्लुएंझा ए एच५ एन १ विषाणू एका पक्ष्याच्या शरीरातून वेगळा करण्यात शास्त्रज्ञांना यश आले. १९९७ मध्ये हाँगकाँगमध्ये माणसांमध्ये ही बर्ड फ्लूची लागण झाल्याचे आढळले. आतापर्यंत जगभरात बर्ड फ्लूची लागण झालेल्या माणसांची संख्या सातशेच्या आसपास आहे.जंगली



पक्ष्यांमध्येदेखील बर्ड फ्लू आढळतो तथापि त्यामुळे ते आजारी पडताना दिसत नाहीत मात्र पक्ष्यांमध्ये हा विषाणू वेगाने पसरताना दिसतो आणि कोंबड्या, बदके किंवा इतर पाळीव पक्ष्यांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये मृत्यू घडून येतात. संसर्ग झालेल्या पक्ष्यांच्या लाळेतून किंवा नाकातील स्त्रावातून आणि विष्ठेतून हे विषाणू बाहेर पडतात. या स्त्रावाचा किंवा विष्ठेचा संपर्क आल्याने इतर पक्ष्यांमध्येही हा आजार पसरत जातो.भारतातील अनेक राज्यात बर्ड फ्लू आजाराची लागण विविध पक्ष्यांमध्ये होताना आपण पाहतो. अनेक प्रदेशात बदके, कोंबड्या, कावळे स्थलांतरित पक्षी यामध्ये प्रामुख्याने या आजाराची लागण अधूनमधून दिसून येते. नुकताच प्रादेशिक अंडी उबवणी केंद्र नागपूर येथील कोंबडयांमध्ये एच५एन१ या विषाणूची लागण झालेली आहे.सध्या हा आजार केवळ पक्ष्यांमध्ये आहे. भारतात आजवर एकही बर्ड फ्लूचा रुग्ण माणसांमध्ये आढळलेला नाही. हा विषाणू माणसांमध्ये वेगाने पसरताना दिसत नाही. त्यामुळे बर्ड फ्लूच्या अनुषंगाने आपण घाबरून जाण्याची गरज नसली तरी याबाबत आपण काय काळजी घ्यावी हे समजून घेणे आवश्यक आहे. यासाठी पुढील खबरदारी आपण प्रत्येकाने घेतली पाहिजे. पक्ष्यांच्या स्त्रावासोबत तसेच विष्ठेसोबत संपर्क टाळा.पक्षी, कोंबड्या यांचे पिंजरे आणि ज्या भांड्यात त्यांना रोज खाणे दिले जाते अशी भांडी रोज डिटर्जंट पावडरने स्वच्छ धुवा. शिल्लक उरलेल्या मांसाची योग्य विल्हेवाट लावा.एखादा पक्षी मरण पावला तर अशा पक्ष्याला उघड्या हाताने स्पर्श करू नका. जिल्हा तसेच विभागीय नियंत्रण कक्षाला ताबडतोब कळवा.कच्च्या पोल्ट्री उत्पादनासोबत काम करताना पाणी व साबणाने आपले हात वारंवार धुवा. व्यक्तिगत स्वच्छता राखा. परिसर स्वच्छ ठेवा. कच्चे चिकन किंवा चिकन उत्पादनासोबत काम करताना मास्क आणि ग्लोजचा वापर करा.पूर्ण शिजवलेले मांसच खा.आपल्या परिसरात जलाशय किंवा तलाव असतील आणि या तलावात पक्षी येत असतील तर अशी ठिकाणे वनविभाग अथवा पशुसंवर्धन विभागात कळवणे आवश्यक आहे.हे करू नका.१. कच्चे चिकन किंवा कच्ची अंडी खाऊ नका.२. अर्धवट शिजलेले मांस/चिकन किंवा अर्धवट उकडलेली अंडी खाऊ नका.३. आजारी दिसणाऱ्या सुस्त पडलेल्या पक्ष्याच्या संपर्कात येऊ नका.४. पूर्णपणे शिजलेले मांस आणि कच्चे मांस एकत्र ठेवू नका.आपल्या भागात कुठेही एखादा पक्षी अथवा कोंबड्या मरून पडताना दिसल्या तर त्यांची विल्हेवाट कशी लावावी, यासंदर्भात पशुसंवर्धन विभागाशी समन्वय साधून योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. आपल्याकडे अनेक ठिकाणी स्थलांतरित पक्षी येतात. सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांच्या सीमारेषेवरील उजनी जलाशय किंवा विदर्भातील नवे बांध आणि पेंच जलाशय ही याची काही उदाहरणे. या पक्ष्यांना पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पर्यटक जमा होतात. बर्ड फ्ल्यूचा धोका लक्षात घेता या पद्धतीचे पर्यटन देखील आपण टाळणे योग्य राहील.एकूण काय प्राणी, पक्षी, पर्यावरण आणि माणूस या सगळ्यांचे आरोग्य हे एकमेकाशी बांधलेले आहे. यालाच आपण ‘वन हेल्थ’ असे म्हणतो. हे लक्षात घेऊन आपण आपल्या पर्यावरणाची आणि आपल्या घरातील पाळीव प्राणी पक्ष्यांची देखील काळजी घेणे आवश्यक आहे. ‘अशी पाखरे येती आणिक स्मृती ठेवुनी जाती’, अशी भावगीते आपण किती आवडीने गातो परंतु पाखरांसोबत नेहमीच केवळ गोड आठवणी नसतात, कधी कधी बर्ड फ्लू सारखा विषाणू देखील असतो हे लक्षात ठेवणे बरे. बर्ड फ्लू माणसाला फारसा होत नसला तरी काळजी घेणे कधीही चांगले, तेव्हा भीती नको पण काळजी मात्र नक्कीच घ्यायला हवी.

# शेततळ्यातील दगड शेतात न वापरता सर्रास गिट्टी क्रेशरला पुरवठा होत आहे

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) बुरकुलवाडी शिवारातील शेततळ्यातील दगडाला हिमायतनगर तालुक्यातील एका गिट्टीक्रशरकडे पाय फुटले आहेत. शेततळ्यातील दगड शेतात न वापरता सर्रास गिट्टी क्रशरला पुरवठा होत असल्याची खबर सहायक जिल्हाधिकारी मेघना कावलींना मिळाल्यावरुन त्यांनी पथकाला पाचारण करुन कारवाई करण्यास भाग पाडले. महसूल पथकाच्या कारवाईनंतर पथकाला कारवाई न करण्यासाठी त्यांनी भ्रमनध्वनीवरुन संपर्क केला परंतू चोख कर्तव्य बजावणाऱ्या पथकाने अखेर वाहन जप्तीची कारवाई केल्याचे सूत्रांनी सांगितले. शेततळ्याची सबब पुढे करुन अवैध दगडी खदान तयार करणार्यांची वाढटी संख्या दिसत आहे. अवैधधंद्यातील सज्ञनांनी अवैध दगड उत्खननावर जोर दिला असला तरी महसूल पथकाने मात्र एक पोकलेन मशिन, एक टिप्पर आणि २ ट्रॅक्टर्सला रंगेहात पकडून इस्लापूर पोलीसांच्या स्वाधीन केल्याचे सूत्रिंनी सांगितले. गिट्टीक्रशरवर जाणाऱ्या दगडाच्या खदान उत्खननाचा परवाना एका ठिकाणचा आणि खदान तयार केली जाते दुसर्याच ठिकाणी. परवाना एका कामासाठी आणि दगड जातो मात्र गिट्टीक्रशरवर. कितीही शक्कल लढऊन फॉर्म्युला कोणताही वापरला तरी यावर महसूल विभागाचा हातोडा पडला की कारवाई तर होणारच. हिमायतनगर तालुक्यातील तालुक्यातील एका शेतकर्याचे किनवट तालुक्यातील बुरकूलवाडी शिवारात शेतजमिन आहे. त्या शेतकर्याच्या शेतात शेततळ्याचे काम चालू आहे. त्यात निघालेला दगड शेतात न वापरता कारवाईतील लोकांना दिला आहे. गिट्टीक्रशरवर हा दगड जात असल्याची माहिती किनवटच्या सहायक जिल्हाधिकारी मेघना कावलींना मिळाली. त्यांनी तलाठी बोधगीरे व तलाठी सकवान यांना यांच्याकडे प्रकरण सोपवले. त्यांनी कोतवाल



अमोल राठोडांना सोबत घेऊन नुकत्याच टाकलेल्या धाडीत एक पोकलॅन मशिन, एक टिप्पर व दोन ट्रॅक्टर्स रंगेहात पकडले. पकडलेल्या गाड्या इस्लापूर पोलीसांच्या ताब्यात दिल्या. कारवाईची प्रक्रिया चालू होती. अशातच महसूल पथकाकडे मुंबईच्या भ्रमनध्वनी धडकला. कारवाई न करण्यासाठी सांगितले मात्र पथकाने हकीकत सांगून त्यांची मागणी धुडकावली. अवैध दगड धंद्यात पांढरपेशांचा हात असल्याचे आनेकदा पहायला मिळाले.

यापुर्वी अशाच स्वरुपाची कारवाई झाल्याची चर्चा ऐकायला मिळाली. सहायक जिल्हाधिकारी कावलींनी गिट्टीक्रेशरांना पर्यावरणाचा परवाना आहे का?, निर्धारीत खानपट्यातूनच उत्खनन व वाहतूक केली जाते का ?, वाहतूकीच्या वाहनांना जीपीएस प्रणालीचा वापर होतो का ?, अशा अन्य बाबी तपासल्या जाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या नावाआड अवैध उत्खनन आणि विनापरवाना वाहतूक करणाऱ्यांचा परवाना गोठवण्यात येऊन कठोर कारवाई करण्यात यावी याही मागणीला उजाळा देण्यात आला आहे. बुरकुलवाडीतील कारवाईमुळे अवैध धंदेवाल्यांचा धागा उत्खनन माफ्यापर्यंत असल्याचे स्पष्ट झाले.

## पंजाबचे माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर साहेबांचा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांच्याहस्ते सत्कार

लातूर दि.१८-०३-२०२४ देशाचे माजी गृहमंत्री तथा पंजाबचे माजी राज्यपाल मा.श्री. शिवराजजी पाटील चाकूरकर हे लातूर दौर्यावर आले असता भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांनी त्यांच्या औसा रोड भागातील देवघर या निवासस्थानी त्यांची भेट घेऊन व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला.यावेळी युवा नेते शैलेश पाटील चाकूरकर, सुभाष देवणीकर, जगनाथ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री तथा पंजाबचे माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर साहेबांच्याबरोबर झालेल्या चर्चेमध्ये पारिवारीक तसेच देशपातळीवरील व जागतिक स्थरावरील महान सुधारकांनी, संतांनी मानवाच्या, राष्ट्राच्या कल्याणासाठी चुकीच्या रूढी परंपरेला दूर सारून सत्यावर, सदाचारावर समाज निर्मितीसाठी जो त्याग बलीदान दिले. याबरोबरच कृत्रिम बुध्दिमत्तेवर चर्चा केली. कृत्रिम वस्तूने दर्शविलेल्या बुध्दिमान वर्तमानास कृत्रिम बुध्दिमत्ता असे आपण म्हणतो. भारतात. कृत्रिम बुध्दिमत्ता नियमन हे भगवतगितेतील श्लोकाचा आधार घेऊन केलेले आहे. त्यामुळे ते



कार्य गैरसंवैधानिक आहे. भगवान श्रीकृष्णाच्या कुळात जन्म घेतलेल्या राजाला कृत्रिम बुद्धिमत्ता नियमनाचा अधिकार आहे आणि या कृत्रिम बुध्दिमत्तेवरच देशाची जागतिक वाटचाल सुरू असल्याची माहितीही त्यांनी यावेळी बोलताना दिली.याबरोबरच राजनीतीमधील सर्वच पक्षातील घसरत चाललेले स्वतःचे चारित्र्य, सामाजिक जाणिव, विकासात्मक दृष्टीकोन सेवाभाव व व्हिजन यामध्ये सकारात्मक बदल करण्यासाठी भारतीय मूल्य, अध्यात्म व थोर नेत्यांचे विचार स्मरणात ठेवण्याची नितांत गरज आहे

# 'उबाठा'च्या गटाने माफी मागितले पाहिजे

मुंबई : शिवाजी पार्कवर झालेली 'इंडिया आघाडी'ची सभा ही फ्लॉप शो होता. त्यामुळे इतर राज्यातून तडीपार झालेली लोक एकत्र आली होती. त्यामुळे 'उबाठा'च्या गटाने माफी मागितले पाहिजे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. राज्यात महायुती ४५ चा पार करणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सीएम शिंदे यांनी शिवाजी पार्कवर झालेल्या इंडिया आघाडीच्या सभेवर जोरदार टीका केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, त्यांच्याकडे पंतप्रधानपदाचा चेहरा आहे का? एकमेकांकडे निराशाने पाहत होते. ते पुढे म्हणाले की, इतर राज्यातून तडीपार झालेली एकत्र आली होती. मग मोदीजींना ही लोक कसे तडीपार करतील? गेल्या ५० वर्षात काँग्रेसला जे जमले नाही ते मोदीजींनी दहा वर्षात करून दाखवले. अर्थव्यवस्था तिस-या क्रमांकावर आणण्याचा प्रयत्न आहे. देशातील ८० कोटी लोकांना मोफत धान्य दिलं जात आहे.लोकांनी जागा दाखवून दिली मोदीजी एका उंचीवर घेऊन गेले आहेत. चौकीदार चोर आहेत म्हणाले, पण लोकांनी त्यांना जागा दाखवून दिली. यांच्याकडे पंतप्रधान पण चेहरा नसल्याने सातत्याने एकमेकांना पाहत असतात अशी टीका त्यांनी केली. शिंदे यांनी राहुल गांधी यांच्या ठाण्यामधील रोडशोवरून खोचक टोमणा मारला. उद्धव ठाकरे यांना देण्यात आलेल्या सभेतील भाषणाच्या कालावधीवरही शिंदे





यांनी टीका केली. पाच मिनिटे भाषणासाठी देण्यात आली यावरून त्यांची पत दिसून आली, असा टोला शिंदे यांनी लगावला. हिंदू बंधू भगिनींनो म्हणायला जीभ कचरली का? माझ्या तमाम हिंदू बांधवांनो हा शब्द कालपासून बंद झाला. काल त्यांनी हिंदू बंधू भगिनींनो म्हणणं टाळलं. हिंदू बंधू भगिनींनो म्हणायला जीभ कचरली का, असं म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर जोरदार निशाणा साधला आहे.

## उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा वैद्यकीय अधीक्षक पदी डॉ.दत्ता केंद्रे

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत ) तालुक्यातील गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉक्टर दत्ता केंद्रे यांची महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या आदेशानुसार त्यांची वैद्यकीय अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबत असे की, शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत विशेषतज्ञ वर्गातील असलेले नामवंत वैद्यकीय अधिकारी डॉक्टर दत्ता केंद्रे यांनी अनेक वर्ष तालुक्यात सेवा दिली आहे. ते अस्तिव्यंगोपचार तज्ञ म्हणून त्यांची ओळख आहे. आणि त्यांच्या अनुभवाचा उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे चांगला फायदा



होणार असून तालुक्यातील रुग्णांना एक उत्तम प्रकारच्या वैद्यकीय सेवा मेळाव्यात अशी आशा वर्तविल्या जात आहे. गोरगरीब जनतेचा दवाखाना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विशाल अशा गोकुंदा उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक पदाची सूत्रे अनुभवी व प्रभावीपणे कर्तव्य बजावणारे डॉक्टर दत्ता केंद्रे यांच्या हाती आरोग्य विभागाने दिल्यामुळे उपजिल्हा गोकुंदा रुग्णालयातील आरोग्य सेवेची परिस्थिती सुधारणार अशा प्रतिक्रिया वर्तुळात उमटत आहे. त्यांची वैद्यकीय अधीक्षक पदी निवड झाल्यामुळे चाहत्यात व संबंधित विभागात आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

## विद्यार्थी जीवनात प्रत्येक गोष्टीचे भान ठेवून वाटचाल करावी - प्रा. ज्ञानेश्वर सोनवणे

मुरूड/महेंद्र आल्टे : आजच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थी जीवनात प्रत्येक गोष्टीचे भान ठेवून वाटचाल करायला हवी तरच आपण यशस्वी होऊ शकतो असे प्रतिपादन प्रा. ज्ञानेश्वर सोनवणे ( नाट्यशास्त्र विभाग, स्वा. रा. ती. महाविद्यालय, अंबाजोगाई) यांनी केले. संभाजी कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन समारंभात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री. पंडितराव टेकाळे (मा.चेअरमन, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक) होते. तर समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.बी.एस.(दादा) पटाडे, समाज जागृती शिक्षण संस्थेचे सदस्य मा. श्री. कर्ण (दादा) पुदाले, दैनिक सकाळचे वरिष्ठ पत्रकार मा. विकास गाढवे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक कळम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी सचिव कु.श्रद्धा शिंदे, सर्व वर्ग प्रतिनिधी यांचीही यावेळी उपस्थिती होती. उद्घाटनपर भाषणात पुढे बोलताना प्रा. ज्ञानेश्वर सोनवणे म्हणाले की,कला ही जीवनाचा अविभाज्य घटक असून प्रत्येक विद्यार्थ्याने विद्यार्थी दशेत आपल्या कलेचे नैपुण्य दाखवायलाच हवे. यातूनच उद्याचे कलाकार घडत असतात.





यावेळी प्रा.सोनवणे यांनी स्वतः एकपात्री कलाविष्कार सादर केला. दैनिक सकाळचे वरिष्ठ पत्रकार मा. विकास गाढवे यांनी स्वअनुभव व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात मा.श्री.पंडितराव टेकाळे म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्याने कॉलेज जीवनात आपले ध्येय निश्चित करावे आणि हे ध्येय गाठण्यासाठी प्रामाणिकपणे परिश्रम करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच आपल्यातील इतर कला गुण कसे बहरतील याकडे देखील लक्ष द्यावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख प्रा.मधुकर क्षीरसागर यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी करून दिला तर आभार प्रा. डॉ. भगत जी. एम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्नेहसंमेलन नियोजन समितीतील प्रा. मधुकर क्षीरसागर, प्रा. डॉ. बी.एम. गोरे, प्रा. एस.एन.उबाळे, प्रा. डॉ भगत जी. एम., प्रसिद्धी विभाग प्रमुख प्रा. डॉ. बिडवे एम.एस. यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सावर्डे येथे आमदार चषक २०२४ भव्य जिल्हास्तरीय नमन स्पर्धा उत्साहात संपन्न

चिपळूण/ प्रतिनीधी: सावर्डे येथे भव्य जिल्हास्तरीय नमन स्पर्धा, उद्घाटन आमदार शेखरजी निकम भैय्या शेठ सामंत , सांस्कृतिक विभाग प्रदेश उपाध्यक्ष अभिनेते दिग्दर्शक असित रेडीज,सचिन पाकळे, केतन पवार, तालुका उपाध्यक्ष राजेंद्र पोमेंडकर, बक्षीस वितरण समारंभ प्रथम क्रमांक हौशी कलाकार नमन मंडळ गोलवली, तालुका संगमेश्वर द्वितीयक्रमांकरवळनाथनमनमंडळरत्नागिरी. तृतीय क्रमांक ए वन केदारनाथ नमन मंडळ सावर्डे भुवडवाडी. तसेच वैयक्तिक पारितोषिके उत्कृष्ट गन उत्कृष्ट गवळण उत्कृष्ट वादन उत्कृष्ट गायन लक्षवेधी सादरीकरण उत्कृष्ट अभिनय... विजेत्या संघाला चित्रपट अभिनेते हास्य जत्रा फ्रेम प्रभाकर मोरे यांच्या हस्ते रोख रुपये पन्नास हजार बक्षीस व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले, द्वितीय क्रमांकाचे बक्षीस रेडीज यांच्या हस्ते रोख रुपये पस्तीस हजार व आकर्षक चषक देऊन गौरवण्यात आले, तृतीय क्रमांक विजेत्याला रोख रुपये २१००० व आकर्षक चषक देऊन गौरवण्यात आले जिल्ह्यातील १४ नामवंत नमन संघाने या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री चंद्रकांत पालकर लांजा श्री शेखर मुळे रत्नागिरी श्री कुळे चिपळूण, श्री प्रदीप



मोहिते चिपळूण यांनी काम पाहिले. स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद रसिकांनी दिला. संपूर्ण स्पर्धेसाठी माननीय आमदार शेखरजी निकम यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले. स्पर्धेसाठी राधा गोविंद फाउंडेशन आणि शिक्षक मित्र सामाजिक प्रतिष्ठान यांनी आयोजक म्हणून चांगले योगदान दिले.. भविष्यामध्ये लोककलावंतांना जे जे सहकार्य लागेल ते देण्याचे माननीय आमदार शेखरजी निकम यांनी आपल्या भाषणामध्ये केले. या स्पर्धेच्या निमित्ताने चिपळूण संगमेश्वर मतदारसंघातील निवडक लोककलावंतांना सह्याद्री कलारत्न पुरस्कार २०२४ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला त्यामध्ये चिपळूण मधून शाहीर शाहिद खेरटकर, श्री भिकाजी बुवा चौगुले , श्री रघुनाथ मिस्त्री, श्री गणपत डिके, श्री बाबू गुडेकर, श्री पांडुरंग कदम, श्री काशीराम जोगले, श्री नितीन बांडागळे यांना सह्याद्री कलारत्न पुरस्कार देण्यात याच व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सांस्कृतिक चित्रपट व कला विभाग जिल्हा कार्यकारिणी पद नियुक्ती करण्यात आली. चिपळूण तालुक्यातून श्री प्रदीप मोहिते, श्री शाहिद खेरटकर, श्री अरविंद जोगळे, श्री भूषण वारे, तसेच संगमेश्वर तालुक्यातून महेंद्र नांदळजकर, नितीन बांडागळे, राजेश भेरें, संदेश बांडागळे किशोर चांदे यांना पद देण्यात आली.

# राजकीय पक्षांना कोट्यवधी देणा-यांमध्ये ३ कंपन्या बीफ एक्सपोर्टर

नवी दिल्ली : देशात सध्या इलेक्टोरल बाँडचा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे. राजकीय पक्षांना कोट्यवधी रुपयांची देणगी देणा-या कंपन्यांविषयी धक्कादायक माहिती समोर येत आहे. या कंपन्यांनी इलेक्टोरल बाँडच्या माध्यामातून भरभरून देणग्या दिल्या आहेत.समोर आलेल्या डेटानुसार राजकीय पक्षांना देणगी देणा-या कंपन्यांपैकी तीन कंपन्या या बीफ उद्योगातील आहेत. तसेच यामध्ये सर्वांधिक देणगी फ्यूचर गेमिंग अँड हॉटेल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने दिली आहे. ही कंपनी लॉटरी व्यवसायाशी संबंधीत असून याचे मालक सेंटियागो मार्टिन आहेत. सध्या मार्टिन कोट्यधीश आहेत पण एकाकाळी ते म्यानमारमध्ये मजूर म्हणून काम करत होते. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाने इलेक्टोरल बाँडसंबंधीचा डेटा निवडणूक आयोगाला सोपवला आहे. त्यानंतर हा डेटा निवडणूक आयोगाने त्यांच्या वेबसाइटवर जाहीर केला आहे. या डेटामधून आता वेगवेगळे खुलासे होते आहेत. त्यानुसार अनेक कंपन्या अशा आहेत ज्यांच्यावर ईडी, सीबीआय आणि आयटी डिपार्टमेंटच्या धाडी पडल्यानंतर त्यांनी कोट्यावधी रुपयांचे इलेक्ट्रोल बाँड खरेदी केली. बीफ एक्सपोर्ट करणारी अल्लान सन्स प्रायव्हेट लिमिटेड, फ्रीगोरीफिको अलाना प्रायव्हेट लिमिटेड आणि फ्यूचर गेमिंग देखील या यादीत आहेत. या कंपन्यांच्या विरोधात छापेमारीची कारवाई झाली त्यानंतरच या कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात इलेक्टोरल बाँड खरेदी करून राजकीय पक्षांना देणग्या दिल्या.९ जुले २०१९ रोजी अल्लाना सन्सने इलेक्टोरल बाँडच्या स्वरुपात दोन कोटी रुपये दान केले होते. यानंतर ९ ऑक्टोबर रोजी एक कोटी आणखी देणगी देण्यात आले. फ्रीगोरीफिको अल्लाना कंपनीने देखील २०१९ मध्ये ९ जुलै रोजी दोन कोटी आणि २२ जानेवारी



२०२० रोजी दोन कोटींचे इलेक्टोरल बाँड खरेदी केले. अल्लानाा ग्रुपशी संबधीत अल्लाना कोल्ड स्टोरेजने ९ जुलै २०१९ मध्ये एक कोटींचे इलेक्टोरल बाँड खरेदी केले. या तिन्ही कंपन्या अल्लाना ग्रुपशी सलग्न आहेत मात्र यांचे डायरेक्टर हेड वेगवेगळे आहेत. अल्लाना कंपनी १८६५ साली स्थापन झाली आणि ही प्रोसेस्ड फूड एक्सपोर्ट करते.२ हजार कोटींचा कर बुडविला अल्लाना ग्रुपच्या चीन कंपन्यांनी एकूण सात कोटी देणगी दिली आहे. एप्रिल २०१९ मध्ये कंपनीवर इन्कम टॅक्स विभागाची धाड पडली होती. यानंतर ९ महिन्यात अल्लाना ग्रुपने सात कोटींचे इलेक्टोरल बाँड खरेदी केले. इन्कम टॅक्स अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार अल्लाना कंपनी बीफ एक्सपोर्ट करणारी देशातील सर्वात मोठी कंपनी मानली जाते. अल्लान ग्रुपवर दोन हजार कोटींचा टॅक्स बुडवल्याचा आरोप आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE